महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No. U40109MH2005SGC153646)
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
**कार्यकारी अभियंता**
अति.उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग-१,पुणे यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, ब्लॉक नं.४०६, ३रा मजला, रास्ता पेठ,पुणे-४११०११
☎(का)२६०६१३६२

संदर्भ : काअ/अउदा/संवसु/विभाग -१/पुणे/मासं/ No 2 0 3 1 दिनांक :- 09 NOV 2023

**शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२३-२०२४ करीता अंतिम निवड सूचना.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यवसायातून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडून (Online) अर्ज जाहीर सूचना क्र.१४०४ दि.०३.०८.२०२३ नुसार मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम दि.३१.०८.२०२३ होती.

जाहीर सूचना क्र.१४०४ दि.०३.०८.२०२३ नुसार एकूण ४३८ उमेदवारांकडून (Online) अर्ज प्राप्त झाल्याने उमेदवारांची निवड यादी त्यांना S.S.C. व ITI (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर या कार्यालयाकडून एकूण २९ उमेदवारांची पत्र क्र. १८८४ दि. १९.१०.२०२३ नुसार तात्पुरती निवड/प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात येवून दि.३१.१०. २०२३ पर्यत कागदपत्रे पडताळणी करिता हजर राहणेबाबत सूचना देण्यात आलेली होती. जे उमेदवार तात्पुरती निवड/प्रतिक्षा यादीनुसार कागदपत्रे पडताळणीकरिता हजर झाले नाहीत त्यांची निवड रद्द करण्यात येत आहे.

शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२३-२०२४ करीता प्रसिध्द करण्यात आलेली जाहीर सूचना पत्र क्र.१४०४ दि.०३.०८.२०२३ नुसार एकूण २९ जागांकरिता २ उमेदवारांनी या कार्यालयास शिकाऊ उमेदवारी करिता प्रतिसाद दर्शविलेला असून,एकूण २७ रिक्त जागेकरिता शिल्लक अनुशेष खालील प्रमाणे आहे.

| अ.जा | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र | इ.मा.व | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २ | १ | १ | १ | ० | १ | ५ | २ | १० | २७ |

'शिकाउ उमेदवारी नोंदणी क्रमांक' (E10202700045) वर दि. ३१.०८.२०२३ पुर्वी ज्या उमेदवारांनी शिकाउ उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत.व ज्यांची यादीमध्ये निवड झालेली नाही अशा उमेदवारांनी रिक्त जागेसाठी (उपलब्ध आरेक्षणानुसार) दिनांक १७.११.२०२३ पुर्वी खालील नमुद केलेल्या पत्यावर सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत (शनिवार,रविवार व सार्वजनिक सूट्टया वगळून ) कागद पडताळणीसाठी हजर रहावे.

दिनांक १७.११.२०२३ पर्यंत कागदपत्रे पडताळणी करिता हजर होणा-या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येवून नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच दि.१७.११.२०२३ नंतर कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांचा निवड यादी मध्ये विचार केला जाणार नाही. तसेच याबाबतीत उमेदवारांचा पत्रव्यवहार किंवा दाव्यांची दखल घेतली जाणार नाही यांची नोंद घ्यावी

**कागदपत्रे/प्रमाणपत्रे:-** **पडताळणी करिता खालील प्रमाणे घेवून यावीत.**

१. शाळा सोडल्याचा दाखला(जन्मतारखेसाठी)
२. ITI Mark list (2/4 Semister) /SSC Mark List & Certificate
३. राखीव गटातून उमेदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र.
४. आर्थिक दुर्बल घटक उमेदवार मोडत असेल तर चालु अद्ययावत प्रमाणपत्र.
५. आधार कार्ड (आधार कार्ड वरील पत्ता पुढील कामकाजासाठी ग्राहय धरला जाईल)
६. Bank Passbook च्या पहिल्या पानाची प्रत

वरील सर्व मुळ कागदपत्रे तसेच सर्व कागदपत्रांचा वरील क्रमाने साक्षांकित प्रतीचा १ संच

**कार्यालयीन पत्ता**

कार्यकारी अभियंता,अउदा संवसु विभाग-१ पुणे
प्रशासकीय इमारत, ब्लॉक नं.४०६, ३रा मजला,
रास्ता पेठ,पुणे-४११०११

(वर्षा बोरकर)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग -१,पुणे.

०८/११/२३

08-11-23

दिनांक:- ०८.११.२०२३